मुंबई विद्यापीठ

क्रं. ग. म./ ८ /२०१४–२०१५

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत शासकीय व अशासकीय, अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापकांचे व विद्यापीठातील अध्यापकांची सेवानिवृत्ती वयोमर्यादित वाढ करण्यासाठी पाठविण्याच्या प्रस्तावांबाबत संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्रमांक ४/आस्था/परिपत्रक/२०१४/१३१ दिनांक २२ एप्रिल, २०१४ अन्वये सुचना दिलेल्या आहेत. तरी सेवानिवृत्ती वयोमर्यादित वाढ करण्यासंदर्भात प्रत सोबत जोडली आहे. सदर सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे अन्यथा निर्माण होणाऱ्या अडचणीस सर्वस्वी संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २० जून, २०१४

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :–

१. मा. श्री सुभाष महाजन, संचालक, तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई–४०० ००१.
२. सह–संचालक, टेक्नीकल एज्युकेशन डिपार्टमेंट, खेरवाडी, बांद्रा(पू),मुंबई–४०००५१.
३. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
४. स्वीय सहाय्यक, प्र–कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
५. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
७. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई – ४०० ०९८.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail :- dte.desk4@gmail.com
Web :- http://www.dte.org.in


क्रमांक : ४/आस्था/परिपत्रक/२०१४/९३१

दिनांक : 2 2 APR 2014

प्रति,
१) संचालक, म.रा., तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
२) सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तसेच अशासकीय अनुदानित पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमातील शिक्षकांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्यासाठी पाठवावयाच्या प्रस्तावाबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१०/(५०३/१०)/विशि-१, दिनांक ५ मार्च, २०११
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०११/(३९६/११)/विशि-१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०११
३) शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०११/(३९६/११)/विशि-१, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२
४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०११/(३७०/११)/विशि-१, दिनांक २८ मार्च, २०१२

उपरोक्त संदर्भाधिन दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय पदवी तसेच पदविका संस्थांतील प्राचार्यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६२ वर्षे करण्यांत आलेले आहे. तसेच प्राचार्यांव्यतिरिक्त उर्वरित अध्यापकांचे वय ५८ वर्षा वरुन ६० वर्षे करण्यांत आलेले आहे. परंतु वयाच्या ६०/६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीस मुदतवाढ देण्यापूर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींच्या अनुषंगाने आढावा घेण्यांत येऊन त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात शासनाच्या मान्यतेने वाढ करण्यात येते.

तद्नंतर संदर्भाधिन दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील सर्वच अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय उपरोक्त प्रमाणे वाढविण्यांत आलेले आहे. तथापि, संबंधित संस्थांतील अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय निर्धारित करण्यासाठी ठराविक निकष व अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करुन शासनाने उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ अन्वये काही मुद्यांच्या अनुषंगाने सुधारित सूचना दिलेल्या आहेत.

सदरच्या शासन निर्णयातील निकष हे सर्वंकष असूनही आपल्या अधिपत्याखालील शासकीय तसेच अशासकीय पदवी तसेच पदविका संस्थांतील अध्यापकांचे वय वाढण्यासाठीचा प्रस्ताव विहीत कालमर्यादेत व आपल्या स्तरावर पडताळणी करुन अचूकरित्या या कार्यालयाकडे प्राप्त होत नाहीत. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, अध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत संबंधितांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी त्यांच्या कामकाजाचा आढावा शासन निर्णयात नमूद केलेल्या विहीत समितीमार्फत घेण्यांत येऊन संबंधितांनी निम्न बाबींची पूर्तता केलेली आहे याबाबतची कागदपत्रे संबंधित समितीच्या शिफारशीसह संबंधितांच्या ६०/६२ वर्षांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी किमान ६ महिने आधी या कार्यालयाकडे आपणाकडून सादर होणे आवश्यक आहे.

१) सदर संस्थेतील अध्यापक / प्राचार्य यांच्या प्रथम नियुक्त्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, विद्यापीठ व राज्य शासनाने विहीत केलेल्या पात्रता, अटी व शर्ती प्रमाणे झालेल्या असणे आवश्यक आहे.

२) संबंधित अध्यापक / प्राचार्य यांची शारीरिक व मानसिक क्षमता सुदृढ असणे आवश्यक असून त्याबाबत तज्ञ वैद्यकीय मंडळाचे (मेडिकल बोर्ड) प्रमाणपत्र सदरच्या प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) संबंधित अध्यापक / प्राचार्य यांनी पीएच.डी अथवा विद्यापीठ अनुदान आयोग तथा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषानुसार पीएच.डी.शी समकक्ष शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

४) संबंधित अध्यापक / प्राचार्य यांचे त्यांच्या अनुक्रमे ६० व ६२ वर्षांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वीचे मागील पाच वर्षातील वार्षिक गोपनीय अहवालाची प्रतवारी किमान तीन वर्षे उत्कृष्ट आणि दोन वर्षे निश्चित चांगला असणे आवश्यक आहे.

५) अनुदानित संस्थांमधील कार्यरत असलेल्या प्राचार्यांना ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी संस्थेने सदर रिक्त पदे भरण्यासाठी वृत्तपत्रात किमान दोन वेळा जाहिरात देऊन पद भरण्याचे प्रयत्न केलेले असले पाहिजेत.

६) शासकीय पदवी तसेच पदविका संस्थांतील अध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ मधील मुद्दा क्र. २ (अ, ब, क, ड, इ) येथे नमूद केलेल्या समितीमार्फत घेऊन सदरचे प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडून या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावेत.

७) अशासकीय अनुदानित पदवी तसेच पदविका संस्थांतील अध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा उपरोक्त नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ मधील मुद्दा क्र. ४ (४) (अ, ब व क) येथे नमूद केलेल्या निकषाप्रमाणे घेऊन पदवी संस्थांतील अध्यापकांचे प्रस्ताव संबंधित विद्यापीठांकडे तसेच पदविका संस्थांतील अध्यापकांचे प्रस्ताव म.रा. तंत्र शिक्षण मंडळाकडे सादर करावेत. व संबंधित विद्यापीठ /म.रा. तंत्र शिक्षण मंडळ यांचे कडून ते विहीत मुदतीत या संचालनालयाकडे सादर केले जातील याची दक्षता समितीच्या सदस्य सचिवांनी घ्यावी.

८) शासकीय पदविका संस्थांमधील अध्यापकांकरीता म.रा. तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारित केलेले निकष व शासकीय पदवी संस्थेतील अध्यापकांकरीता संबंधित विद्यापीठाने निर्धारित केलेले निकष विचारात घेऊन प्रस्तावांची प्राथमिक पडताळणी करुन सहसंचालकांनी त्यांचे अभिप्रायासह प्रस्ताव ६ महिन्यापूर्वी संचालनालयास प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त अटी या स्वयंस्पष्ट असूनही विभागीय कार्यालयांकडून सदरचे प्रस्ताव विहीत कालमर्यादेत तसेच विहीत कागदपत्रांसह शासनाची मान्यता मिळविण्यासाठी या कार्यालयाकडे सादर केले जात नाहीत ही खेदाची बाब आहे.

तरी, आपणांस पुन्हा कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय तसेच अशासकीय अनुदानित पदवी तसेच पदविका संस्थांतील अध्यापक / प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीत वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे छाननी करुन विहीत कागदपत्रांसह या कार्यालयास सदरचे अध्यापकांच्या / प्राचार्यांच्या ६०/६२ वर्षांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी किमान ६ महिने आधी या कार्यालयाकडे आपणाकडून सादर करण्यांत यावेत. जे अध्यापक निकषांची पूर्तता करीत नाहीत असे प्रस्ताव शासनास / संचालनालय सादर करण्यांत येऊ नयेत. याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन कळविण्यांत यावे. तसेच जे प्रस्ताव विहीत मुदतीत व अचूक प्राप्त होणार नाहीत व त्यामुळे भविष्यात अडचणी निर्माण झाल्यास त्यास आपण जबाबदार असाल याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्र शिक्षण, म.रा. मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीकरिता सविनय सादर.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
१) कुलसचिव, सर्व विद्यापीठे
२) उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये